# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/11/2022 (शुक्रवार) दुपार

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपींवर कारवाई

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावर मौजा पिपळा शिवार येथे दिनांक ११/११/२०२२ चे ०२.०० वा. ते ०२.४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ हे कन्हान नदीच्या पात्रात पेट्रोलिंग करीत असतांना यातील आरोपी नामे— पारस ज्ञानेश्वर भोयर, वय २३ वर्ष, रा. वार्ड नं १, रत्नापुर ता. देवळी, जि. वर्धा हे मु. वार्ड नं ३, इसापुर हे कन्हान नदीच्या पात्रातुन विना क्रमांकाचा लाल रंगाचे महिन्द्रा कंपनीचे युवो मॉडल नं ५७५ डी आय टॅक्टर व विना क्रमांकाचा ट्रॉलीने अवैधरीत्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातुन विना क्रमांकाचा लाल रंगाचे महिन्द्रा कंपनीचे न्यु मॉडल नंबर ५७५ डी आय टॅक्टर किंमती ६,००,०००/— रु. व विना क्रमांकाची ट्रॅक्टर व ट्रॉली किंमती ८०,०००/—रु. तसेच ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ब्रॉस रेती किंमती ३०००/—रु. असा एकुण ६,८३,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— सरकारतर्फे सहायक पोलीस निरीक्षक दिपक नामदेवराव कॉक्रेटवार, पो.स्टे. खापरखेडा यांचे रीपोर्टवरून आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन ट्रॅक्टर व ट्रॉली चालक आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन खापरखेडा करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत १० किमी. अंतरावर गुमथळा शिवार येथे दिनांक १०/११/२०२२ चे १४.३० वा. दरम्यान यातील टँकर क्र. TN-30-BP-9699 चे चालक आरोपी नामे—रामचंद्र रामकिष्णा, वय ४५ वर्ष, रा. ४—१०२ मुल्ली चेट्टीपल्ली, ठिणापल्ली पोलीस स्टेशन थुम्बीपडी ता. ओमलुर, जि. सालेम राज्य तामिलनाडु यांनी आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून त्याचे समोर असलेल्या एक्टीवा गाडीला मागेहुन धडक मारल्याने एक्टीवा गाडी चालक नामे —विजय कुंडलिक भुरे, वय ३३ वर्ष हा जखमी होवुन त्याचे मागे बसलेली त्याची पत्नी नामे—मोनीका विजय भुरे, वय २७ वर्ष, रा. डोंगरगाव, ता. मोहाडी, जि. भंडारा ही मरण पावली तसेच आरोपी टँकर क्र. TN-30-BP-9699 चालक हा स्वत:चे सुद्धा मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—पोलीस हवालदार गौतम मेश्राम, बं. न. १६९ पोलीस स्टेशन मौदा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपी ट्रॅक्टर चालकाविरुध्द कलम २७९ ३३७, ३०४ (अ) भादवी, सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**